**विशेष दिवाणी दावा क्र. ४७ / २०१९**

रेश्मा इंगळे / तानगावडे
वि.
समीर इंगळे / तानगावडे वगैरे

**<u>आदेश निशाणी क्र. ७५ वर</u>**

1. प्र. वादी क्र. १ ते ३ यांना या प्रकरणामध्ये महत्वाची कागदपत्रे दाखल करावयाची आहेत. त्यास परवानगी दयावी याकरिता हा अर्ज देण्यात आलेला आहे. वादी यांनी त्याला तीव्र आक्षेप नोंदवलेला आहे.

2. फौजदारी प्रकरणातील सर्टीफाईड प्रती प्रतिवादी यांना दाखल करावयाचे आहेत. या प्रकरणातील वाद विषयाचा गुणदोषावर अंतिम व योग्य निर्णय होण्यासाठी प्रस्तुत कागदपत्रे आवश्यक आहेत असे प्रतिवादी यांनी सांगितले. ती कागदपत्रे रेकॉर्डवर दाखल करण्यास परवानगी दिली तर विरुध्द पक्षकार यांचेवर कोणताही अन्याय होणार नाही. सबब, मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आ दे श</u>**

1. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.
2. सोबतच्या यादीप्रमाणे कागदपत्र दाखल करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

दिनांक : २५/०३/२०२१

( श्रीकृष्ण हरिभाऊ इनामदार )
दिवाणी न्यायाधीश व. स्तर, पंढरपूर.